लोकमत
सोमवार २७.११.२०२३

# ऑनलाइन शिक्षणाने गुणवत्ता ढासळेल

## डॉ. रमेश कुंभार : नव्या धोरणाची जागृती हवी

कॉलेजच्या अवती-भवती

पोपट पवार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सरकारने यंदाच्या वर्षापासून लागू केलेल्या नव्या शैक्षणिक धोरणात कौशल्याधारित, आधुनिक शिक्षणावर भर दिल्याने भावी पिढी स्वावलंबी होण्यास बळ मिळाले आहे. मात्र, या शैक्षणिक धोरणात ऑनलाइन शिक्षणाकडेच अधिक ओढा असल्याने विद्यार्थ्यांची गुणवत्ता ढासळेल, अशी भीती कोल्हापुरातील स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश कुंभार यांनी लोकमतशी बोलताना व्यक्त केली.

नवे शैक्षणिक धोरण २०२०, त्याची अंमलबजावणी, सर्वच स्तरावरची जनजागृती यावर डॉ. कुंभार यांनी प्रखर मते मांडताना यातील गुणदोषही निदर्शनास आणले. डॉ. कुंभार म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणाबाबत शासन व विद्यापीठस्तरावर विविध माध्यमातून जनजागृती करूनही या शिक्षणातील बारकावे अद्यापपर्यंत समाजापर्यंत पोहोचलेले नाहीत. या शिक्षणाचे फायदे तळागाळापर्यंत पोहोचले तर यातील अनेक चांगल्या गोष्टी लवकर स्वीकारणे शक्य होईल. अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिटस (एबीसी) ही संकल्पना खूप चांगली आहे. यामुळे विद्यार्थ्याला शिक्षणाचे पूर्णतः स्वातंत्र्य मिळाले आहे. देशभरातील कोणत्याही विद्यापीठातून आपले शिक्षण पूर्ण करता येऊ शकते. नव्या शैक्षणिक धोरणात ऑनलाइन शिक्षण ४० टक्क्यापर्यंत नेण्याचे सुचविले आहे. मात्र, यामुळे विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण मिळणार नाही.

या धोरणात आंतरविद्याशाखीय शिक्षणाची पद्धत अवलंबली आहे. यामुळे विद्यार्थ्याला हव्या त्या विषयांचे ज्ञान मिळू शकणार आहे. मात्र, महाविद्यालयीन स्तरावर याची अंमलबजावणी करणे मोठे आव्हान ठरत आहे. उदा. सायन्सच्या विद्यार्थ्याने कला शाखेतील एखादा विषय घेतला असेल तर त्याला दोन्हीकडच्या वर्गातील वेळ ॲडजेस करावा लागतो. असे आवडीचा विषय ठेवणारे असंख्य विद्यार्थी आहेत. या सर्वांचे मुख्य व आवडीचे विषय वेगवेगळे असतील. प्रत्येकाला वेगवेगळ्या वेळी शिकवणे शक्य होणार नाही. त्यामुळे वेळापत्रक ठरविणे हेच मोठे आव्हान बनेल, असे डॉ. कुंभार यांनी सांगितले.



### मातृभाषेतून शिक्षण चांगलेच; पण...

नव्या शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून शिक्षणाला अधिक महत्त्व दिले आहे. ते चांगलेही आहे. यामुळे मातृभाषेत अनेक नव्या शब्दांची भर पडू शकेल. नव्या पिढीला मातृभाषेबद्दल अधिक आपुलकी, आदर वाढेल; पण जागतिक स्पर्धेत टिकायचे असेल तर इंग्रजी येणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.

### व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे

डॉ. कुंभार म्हणाले, विवेकानंद महाविद्यालयात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. या विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरच्यादृष्टीने ट्रेनिंग प्रोग्रामच्या (प्रशिक्षण कार्यक्रम) माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे दिले जातात. मागील वर्षात ३५० विद्यार्थ्यांना तर यंदाच्या शैक्षणिक वर्षात तीन प्रोग्राम घेतले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास अधिक दृढ होत आहे.

27/11/23

28.11.23

लोकमत दि. 27.09.2023

# विवेकानंद कॉलेज, महाराष्ट्र हायस्कूलला अजिंक्यपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : निदा सत्तारमेकर हिच्या एकमेव गोलच्या जोरावर विवेकानंद कॉलेजने पोदार इंटरनॅशनल स्कूलचा चुरशीच्या लढतीत १-० असा पराभव करीत १९ वर्षांखालील मुलींच्या फुटबॉल स्पर्धेत विजेतेपद पटकाविले. चौदा वर्षांखालील मुलांमध्ये महाराष्ट्र हायस्कूलने छत्रपती शाहू विद्यालयाचा २-० असा पराभव करीत अजिंक्यपद पटकाविले.

विभागीय क्रीडा संकुलात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व महानगरपालिका यांच्यावतीने विविध वयोगटांतील शालेय फुटबॉल स्पर्धा आयोजित केली आहे. याअंतर्गत मुलींच्या एकोणीस वर्षांखालील शालेय फुटबॉल स्पर्धेत विवेकानंद कॉलेजने पोदार इंटरनॅशनल स्कूलचा १-० असा पराभव करीत विजेतेपद पटकाविले. हा विजयी गोल निदा सत्तारमेकर हिने नोंदविला.

चौदा वर्षांखालील मुलांमध्ये महाराष्ट्र हायस्कूलने छत्रपती शाहू विद्यालयाचा २-० असा पराभव केला. विजयी गोल ऋषिकेश हराळे, राजवीर खराडे यांनी प्रत्येकी एक गोल नोंदविला. स्पर्धेचा बक्षीस समारंभ अतिरिक्त आयुक्त केशव जाधव यांच्या हस्ते झाला.

27/09/23

27.9.23